अति. महा. आयुक्त (ज) यांचे कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे–५.
जा.क्र. :– अतिमआ/साप्रवि/आस्था/९५५०
दिनांक :– ११ /०६/२०१६

## –: कार्यालयीन आदेश :–

विषय :– श्री. ज्ञानेश्वर मोळक, सह महापालिका आयुक्त (स्थानिक संस्था कर) यांचे अर्जित रजा कालावधीत त्यांचे पदाचे कामकाज व्यवस्थेबाबत.

संदर्भ :– १) जावक क्र. साप्रवि/आस्था/१४६४, दिनांक ०७/०६/२०१६.
२) मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. १/२२४, दिनांक १०/०६/२०१६.

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील सह महापालिका आयुक्त, स्थानिक संस्था कर कार्यालय या पदावर कार्यरत असलेले श्री. ज्ञानेश्वर मोळक, यांनी दिनांक ०६/०६/२०१६ ते दिनांक २४/०६/२०१६ अखेर १९ दिवसांची (दिनांक २५/०६/२०१६ आणि दिनांक २६/०६/२०१६ या शासकीय सुट्टयास जोडून) अर्जित रजा मिळणेस विनंती अर्ज केला आहे. त्यास मा. महापालिका आयुक्त यांनी संदर्भ क्र. २ चे ठरावान्वये मान्यता दिली आहे.

श्री. ज्ञानेश्वर मोळक, यांचे उपरोक्त रजा कालावधीत सह महापालिका आयुक्त, स्थानिक संस्था कर या पदाचा व त्यांचेकडीत अतिरिक्त पदभार यांचा अतिरिक्त पदभार श्री. सुहास मापारी, उप आयुक्त, कर आकारणी व कर संकलन यांचेकडे सोपविणेत येत आहे.

श्री. सुहास मापारी, उप आयुक्त, कर आकारणी व कर संकलन, यांनी स्वत:च्या पदाचे कामकाज सांभाळून सह महापालिका आयुक्त, स्थानिक संस्था कर या पदाचा व त्यांचेकडीत अतिरिक्त पदभार या पदांचे संपुर्ण कामकाज उपरोक्त रजा कालावधीत करावयाचे आहे.

श्री. सुहास मापारी, यांनी वरीलप्रमाणे अतिरिक्त पदभार स्विकृत केलेबाबतचे निवेदन आमचे कार्यालयाकडे सादर करावयाचे आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजविज करावी.

(राजेंद्र जगताप)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
पुणे महानगरपालिका.

प्रत:– **सर्व संबंधित मा.खातेप्रमुख,**
पुणे महानगरपालिका.
यांजकडे माहिती व पुढील तजविजीसाठी रवाना . . . .

११/०६/१६

**उप आयुक्त (सामान्य प्रशासन)**
पुणे महानगरपालिका.